# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः30.09.2024** **वारःसोमवार**

---

1. राज्यातल्या 11 हजार 200 कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचं पंतप्रधानांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं भूमिपूजन आणि लोकार्पण
2. पुणे मेट्रोच्या शिवाजीनगर न्यायालय ते स्वारगेट या भुयारी मार्गाचंही केलं उद्घाटन
3. सर्जनशील तरुणाईनं क्रिएट इन इंडिया उपक्रमात सहभागी व्हावं-पंतप्रधानांचं मन की बात मधून आवाहन
4. सशक्त राष्ट्रनिर्मितीमध्ये शेतकऱ्यांचं योगदान महत्त्वपूर्ण असल्याचं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचं प्रतिपादन आणि
5. शासकीय औद्योगिक संस्थांमधल्या तरुणींना स्वरक्षणाचं मोफत प्रशिक्षण देणाऱ्या 'हर घर दुर्गा' अभियानाला आजपासून प्रारंभ

पंतप्रधान

देशात आधुनिकीकरण आणि विकास करताना आपला समृद्ध वारसाही पुढे नेण्यात येईल, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. राज्यातल्या 11 हजार 200 कोटींहून अधिक रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांचं उद्घाटन, भूमिपूजन आणि लोकार्पण पंतप्रधानांच्या हस्ते दूरस्थ माध्यमातून झालं, त्यावेळी ते बोलत होते. सरकारच्या या विविध योजना शहरी विकासाला चालना देतील आणि नागरिकांचं जीवनमान अधिक सोपं करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पुणे मेट्रोच्या शिवाजीनगर न्यायालय ते स्वारगेट या मार्गाचं उद्घाटन, स्वारगेट ते कात्रज या नवीन विस्तारित मार्गिकेचं आणि पुण्यातील भिडेवाडा इथल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाचं भूमिपूजनही काल पंतप्रधानांच्या हस्ते झालं.

पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येमुळे शहराच्या विकासाचा वेग मंदावू नये आणि वाढत्या शहरीकरणाच्या काळात पुणे विकासाचं एक महत्त्वाचं केंद्र व्हावं, यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचं मोदी म्हणाले. सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा ज्या ठिकाणी सुरू केली; त्या ठिकाणी उभारण्यात येणारं स्मारक सर्वांसाठी प्रेरणा देणारं ठरेल असं पंतप्रधान म्हणाले...

**समाज में बदलाव की ज़िम्मेदारी जब महिलाएं उठाती हैं, तो क्या कुछ हो सकता है, महाराष्ट्र की धरती तो इसकी साक्षी रही है। इसी धरती ने और इस धरती से सावित्रीबाई फुले ने महिलाओं की शिक्षा के लिए इतना बड़ा आंदोलन शुरू किया था। यहाँ बहन-बेटियों के लिए पहला स्कूल खोला गया था। इसकी स्मृति को, इस विरासत को संजो कर रखना जरूरी है। आज मैंने देश के उसी प्रथम गर्ल्स स्कूल में सावित्री बाई फुले मेमोरियल की आधारशिला रखी है। ये मेमोरियल सामाजिक चेतना के उस जन-आंदोलन की स्मृतियों को जीवंत करेगा। ये मेमोरियल हमारे समाज को, हमारी नई पीढ़ी को प्रेरणा देगा।**

याच कार्यक्रमात सोलापूर विमानतळ आणि छत्रपती संभाजीनगर जवळचा बिडकीन प्रकल्प राष्ट्राला समर्पित करण्यात आला. व्यापार, उद्योग, व्यवसायासह विठ्ठलाच्या दर्शनासाठी जगभरातून लोक आता विमानाने येऊ शकतील असं मोदी म्हणाले. मराठवाड्याला प्रमुख आर्थिक केंद्र बनवण्याची क्षमता बिडकीन औद्योगिक क्षेत्रात आहे. या प्रकल्पामुळे औद्योगिक गुंतवणूकीला आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पुण्यात गणेश कला क्रीडा रंगमंच इथं झालेल्या प्रत्यक्ष कार्यक्रमात राज्यपाल सी. पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

पायाभूत सुविधा आणि उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र देशात अग्रेगर असल्याचं मुख्यमंत्री आपल्या भाषणात म्हणाले. पुण्याचा झपाट्याने विकास होत असताना इथली वाहतूक कोंडी कमी करणं ही राज्य शासनाची जबाबदारी आहे; म्हणूनच पुण्याच्या मेट्रोचा विस्तार करण्यात येत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. पुरंदर विमानतळाचा प्रश्न लवकर मार्गी लावावा अशाही सूचनाही त्यांनी संबंधितांना दिल्या.

या उद्घाटन सोहळ्यानंतर मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि अजित पवार तसंच अन्य मान्यवरांनी पुणे मेट्रोच्या नवीन मार्गावरून प्रवास केला. काल दुपारपासून स्वारगेट ते शिवाजीनगर न्यायालय ही भुयारी मेट्रो सेवा नागरिकांसाठी सुरू झाली.

**मन की बात**

सर्जनशील कलाकारांच्या प्रतिभेला संधी देण्यासाठी माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं सुरू केलेल्या क्रिएट इन इंडिया (create in India) या उपक्रमात सहभागी होण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तरुणाईला केलं. आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमाच्या 114 व्या भागात त्यांनी काल देशवासीयांशी संवाद साधला. मन की बात या कार्यक्रमाची येत्या तीन ऑक्टोबरला दशकपूर्ती होते आहे; त्या पार्श्वभूमीवर, या कार्यक्रमाच्या प्रसारणाची धुरा सांभाळणाऱ्या आकाशवाणी, दूरदर्शन, त्याबरोबरच अन्य प्रसार माध्यमं, आणि समाज माध्यमांच्याप्रति पंतप्रधानांनी कृतज्ञता व्यक्त केली. लोकांना सकारात्मक, प्रेरणादायी गोष्टी ऐकायला आवडतात, हे मन की बात या कार्यक्रमानं सिद्ध केलं असं ते म्हणाले. 2014 मध्ये सुरू केलेल्या स्वच्छ भारत मिशन, तसंच मेक इन इंडिया या उपक्रमांचीही यंदा दशकपूर्ती होत आहे; याबाबत सांगताना, राज्यातल्या भंडाऱ्याच्या टसर सिल्क हँडलूमचा उल्लेख त्यांनी केला. स्थानिक समुदायांना सक्षम करणं, हाच मेक इन इंडियाचा गाभा असून, लोकसहभागातून या चळवळीं यशस्वी झाल्याचं ते म्हणाले. येत्या सणासुदीच्या काळात स्थानिक उत्पादनांची खरेदी करा; केवळ मातीचे दिवे खरेदी करणं म्हणजे वोकल फॉर लोकल नसून भेटीवस्तू देताना स्थानिक उत्पादनांना अधिकाधिक पसंती द्या, असं आग्रही प्रतिपादन पंतप्रधानांनी केलं.

**राज्यपाल-कृषी पुरस्कार**

सशक्त समाज आणि राष्ट्रनिर्मिती शेतकऱ्यांच्या योगदानाशिवाय शक्य नसल्यानं, राज्यातल्या शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काल केलं. राज्यपालांच्या हस्ते काल कृषी पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. 2020 ते 2022 या तीन वर्षातल्या 448 कृषी पुरस्कारांचं वितरण यावेळी झालं. राज्यात राबवण्यात येणारी एक रुपयात विमा योजना ऐतिहासिक असल्याचे गौरवोद्गार राज्यपालांनी यावेळी काढले. शेतकरीच राज्याचे खरे दूत आहेत असे गौरवोद्गार यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काढले. कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**सातारा-कृषीसंकुल**

पश्चिम महाराष्ट्रातील उत्तम शेतकरी प्रशिक्षण केंद्र म्हणून लोकनेते बाळासाहेब देसाई बहुउद्देशीय कृषी संकुल नावारूपास येईल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल साताऱ्यात व्यक्त केला. सातारा जिल्ह्यातल्या पाटण तालुक्यात काळोली इथल्या या केंद्राच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. पाटण तालुक्यातील 289 कोटी रुपयनकीय विविध विकास कामांचं भूमीपूजन आणि लोकार्पणही यावेळी झालं. नाडे ग्रामपंचायतीच्या आवारात उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याचं अनावरणही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं.

**<u>प्रशिक्षण</u>**

शासकीय औद्योगिक संस्थांमधील तरुणींना स्वरक्षणाचं मोफत प्रशिक्षण दिलं जाणार आहे. त्या अनुषंगानं, 'हर घर दुर्गा' अभियानाचा प्रारंभ आज लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या हस्ते होणार आहे. राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काल ही माहिती दिली. मुंबईच्या कुर्ला इथल्या शासकीय औद्योगिक संस्थेत यासाठी आयोजित कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित राहणार आहेत.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि बांग्लादेश यांच्यातल्या कानपूर क्रिकेट कसोटीच्या कालच्या तिसऱ्या दिवसाचा खेळ रद्द करण्यात आला. त्या आधी पावसामुळे दुसऱ्या दिवशीही खेळ झाला नव्हता; पहिल्या दिवशी खेळ थांबवावा लागला; त्यावेळी बांग्लादेशाच्या 3 बाद 107 धावा झाल्या होत्या. दोन कसोटी सामन्यांच्या या मालिकेतला पहिला सामना भारतानं जिंकला आहे.

**<u>हवामान</u>**

दक्षिण कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि विजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.